# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील ग्रामरोजगार सेवकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत**

**(१) ३२९८० (०७-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामरोजगार सेवकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत रोजगार हमी मंत्री, महाराष्ट्र राज्य महोदय यांचेसमवेत बैठकीची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत एकूण होणाऱ्या कामाच्या ६% रक्कम संबंधीत रोजगार सेवकास वेतन किंवा मानधन स्वरुपात मिळते तसेच प्रत्यक्षात मात्र सर्वच ठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे करण्याकरीता आवश्यक अशी कामे गावनिहाय होताना दिसत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्हानिहाय करण्यात आलेल्या सन २०१४ या कालावधीत ते आज अखेर निधीचा तपशील काय असून राज्यातील प्रत्यक्ष जॉबकार्ड असणाऱ्या व्यक्तींची जिल्हानिहाय संख्या किती आहे,

(४) असल्यास, रोजगार सेवकांना उत्तर प्रदेश सरकारच्या १०,००० मानधन देते याच धर्तीवर राज्यातील रोजगार सेवकांना मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मागणी प्रधान योजना आहे. प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये तसेच तालुकास्तरावर तांत्रीक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेऊन ग्राम पंचायत व तालुकास्तरावर कामाचा शेल्फ ठेवण्यात येतो व मागणीप्रमाणे कामे उपलब्ध करुन देण्यात येतात.

(३) २०१४-१५ ते २०२१-२२ या कालावधीत ९८०१५७३ जॉबकार्ड धारक आहेत. वर्षनिहाय व जिल्हानिहाय जॉब कार्ड धारकांची संख्या दर्शविणारा Nrega Soft वरील अहवाल तसेच अकुशल (मजुरी) अदा करण्यात आलेल्या रकमेचा तक्ता सोबत जोडला आहे.

(४) मनरेगाच्या कामावर मजुरांनी यावे या करीता प्रचार व प्रसिध्दी केली जाते. शासन निर्णय दिनांक १ मार्च,२०१४ नूसार २९ जिल्ह्यात व ८ मार्च २०२१ नुसार ५ जिल्ह्यात निर्मित केलेल्या मनुष्य दिवसाचे अनुपातामधे मनुष्यदिनाची परिगणना करुन ग्राम रोजगार सेवकांना मानधन अदा केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंडणगड (जि.रत्नागिरी) किल्ल्याचा विकास आराखडा मंजूरीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(२) ३३३९८ (१२-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड (जि.रत्नागिरी) किल्ल्याचा युको टुरिझम अंतर्गत विकास आराखडा शासनाकडे मंजूरी अभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू किल्ला हा वन विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंडणगड किल्ल्याचा विकास आराखडयासाठी सुमारे १४ कोटी रक्कमेच्या निधीची तरतुद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त आराखडयास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१२-२०२२) :** (१) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) कोल्हापूर यांनी मंडणगड (जि.रत्नागिरी) किल्ल्याचा रु.५४९.७१ लक्षचा निसर्ग पर्यटन आराखडा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालयास मंजूरीसाठी सादर केलेला आहे.
(२) हे खरे आहे, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडील दिनांक १९.२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर किल्ला महसूल विभागाकडून वनविभागाने ताब्यात घेतला आहे.
(३) व (४) आमदार महोदयांनी तत्कालीन मंत्री (वने) यांचेकडे मंडणगड किल्ल्याचा निसर्ग पर्यटनच्या माध्यमातून विकास होण्यासाठी रु.१४३१.६८ लक्ष रकमेच्या प्रस्तावाबाबत निवेदन दिले होते. तथापि, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) कोल्हापूर यांनी रक्कम रु.५४९.७१ लक्षचा सुधारित आराखडा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकडे मान्यतेकरीता सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दरसवाडी-डोंगरगाव पोहोच (ता.चांदवड, जि.नाशिक) कालव्यात संपादित झालेल्या जमिनींचा मोबदला बागायतदारांना मिळण्याबाबत

**(३) ३५८०८ (०७-०१-२०२२). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दरसवाडी-डोंगरगाव पोहोच (ता.चांदवड, जि.नाशिक) कालव्यात संपादित झालेल्या जमिनींचा मोबदला बागायतदारांना मिळण्यासाठी काजीसांगवी येथील शेतक-यांनी चांदवडच्या उपविभागीय अधिका-यांकडे बागायत जमिनींचे सर्व पुरावे देऊनही त्यांच्या लेखी जमिनीवर जिराईतचा शेरा दिल्याने लाभार्थी शेतक-यांचे आर्थिक नुकसान होणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शेतक-यांच्या जमिनींवर जिराईत शेरा मारण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू शेरा बदलून या जमिनी बागायत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) मौजे काजीसांगवी येथील दरसवाडी - डोंगरगाव पोहोच कालव्यासाठी सरळ खरेदीने जमीन संपादनासाठी प्रस्तावित सन १९७५-७६ पासूनचे जमीनीचे अधिकार अभिलेख गांव नमुना क्र.७/१२ चे पिकपहाणी वरुन मुख्यत: जिरायत असल्याचे आढळून आले. त्यानुसार थेट खरेदीचा प्रस्ताव सादर करण्यात येऊन, त्यानुसार दिनांक १३.०२.२०२० रोजी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या दालनात दर निश्चितीकामी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत भूधारकांनी जिरायत / हंगामी बागायत / बागायत याप्रमाणे तलाठी यांच्याकडून अहवाल घेऊन प्रस्ताव सादर करावा अशी मागणी केल्याने, भूधारकांवर अन्याय होऊ नये यास्तव भूधारकांचे क्षेत्र हे हंगामी बागायत असल्याबाबत सबळ पुराव्यानिशी फेरप्रस्ताव सादर करण्याबाबत बैठकीत निर्देश दिलेले आहेत.
त्याअनुषंगाने तहसिलदार, तलाठी व कृषि अधिकारी यांच्याकडून जमीन संपादित होणाऱ्या मिळकतीबाबत जिरायत, हंगामी बागायत व बागायतबाबत संयुक्त स्वाक्षरीसह स्वयंस्पष्ट अहवाल घेण्यात आलेला आहे व त्यानुसार मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या दालनात दिनांक २२.०४.२०२२ रोजी जिल्हास्तरीय समितीची बैठक घेण्यात येऊन

सदर संपादित जमिनीच्या थेट खरेदीसाठी जमीनींच्या दरास मान्यता दिलेली असून त्याअनुषंगाने संबंधित यंत्रणा नांदुरमध्यमेश्वर प्रकल्प विभाग, नाशिक यांना पुढील कार्यवाही करण्याकामी निर्देश दिलेले आहे.
(२) अशी बाब नाही.
(३) संबंधित भूसंपादित गटाचे सन १९७५-७६ पासूनच्या गांव नमुना क्र.७/१२ चे पिकपहाणी अवलोकन करता सदर मिळकती मुख्यत: जिरायत, हंगामी बागायत व बागायत अशी वर्गवारी झालेले असल्याचे दिसून येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडू पदक विजेत्या खेळाडूंकरिता यांना "एक टप्पा पदोन्नत्ती" देण्याबाबत**

**(४) ३७८५० (१२-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उपमुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडूंनी (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धा, अखिल भारतीय पोलीस क्रीडा नियंत्रण मंडळ यांनी आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये वैयक्तीक व सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये पदक प्राप्त कामगिरी केल्यास त्यांना "एक टप्पा पदोन्नत्ती" देण्याबाबत शासन मान्यता नसल्याने प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रीडा स्पर्धांमध्ये वैयक्तीक व सांघिक क्रीडा प्रकारात पदक प्राप्त कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना पोलीस नाईक ते पोलीस उपअधिक्षक या पदावर एक टप्पा पदोन्नत्ती मंजूर करण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित करावेत अशी मागणी पोलीस महासंचालक यांनी माहे जून, २०२१ मध्ये तसेच लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने सद्य:स्थिती काय आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०२२) :** (१),(२) व (३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडूंसाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनस्तरावर शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच सामान्य प्रशासन विभाग यांचे समवेत विचारविनिमय करण्यात आला असून, राज्य शासनाच्या अधिपत्याखालील सर्व विभागांतर्गत पदोन्नती प्रक्रियेत समानता असणे आवश्यक असल्याने पोलीस विभागाकरिता वेगळे पदोन्नती धोरण निश्चित करणे योग्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली (जि बुलढाणा) येथील उपजिल्हा रुग्णालय १०० खाटांचे करण्याबाबत**

**(५) ४०४३१ (११-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि. बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालय म्हणून वाढ झालेली असून ३० खाटावरून ५० खाटांना मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखली हे शहर मोठे असून तालुक्यात १५० गावे असल्याने ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय अपुरे पडणार असल्यामुळे सदर उपजिल्हा रुग्णालय १०० खाटांचे करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ ऑक्टोबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास मा.आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०६-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

चिखली (जि.बुलढाणा) ग्रामीण रुग्णालयाचे ३० खाटावरून ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय म्हणून श्रेणीवर्धन करण्यास दि.१७.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता मिळालेली आहे

(२) व (३) होय, हे खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय चिखली बुलढाणा ५० वरुन १०० खाटांचा करण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधींचे पत्र दि.१८.१०.२०२१ रोजी शासन स्तरावर प्राप्त झाले आहे. तसेच सदर विषयानुसार श्रेणीवर्धनाचा प्रस्ताव दि.१५.०१.२०१९ अन्वये शासन स्तरावर प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावातील त्रुटिंची पुर्तता करण्याबाबत दि.२६.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत नवीन आरोग्य संस्था स्थापना व श्रेणीवर्धन करण्यासाठी आरोग्य संस्थांचा नवीन बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे. त्यानुसार सदर प्रस्तावाची छाननी करुन निकषात बसत असल्यास नवीन बृहत आराखड्यामध्ये प्रस्तावीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी असेही कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथे पंचायत समितीत रोजगार हमी योजनेतील कामांबरोबरच अनेक कामे प्रलंबित असल्याबाबत

**(६) ४१७२२ (०७-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथे पंचायत समितीत प्रामुख्याने रोजगार हमी योजनेतील कामांबरोबरच अनेक कामे प्रलंबित असल्याच्या तक्रारी जिल्हा परिषदेकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी यांना एक महिन्यांच्या आत प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आदेश माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुषंगाने सदर प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) चौकशीची आवश्यकता नाही.पंचायत समिती हातकणंगले यांना मग्रारोहयो अंतर्गत ३२१६३ इतकया मनुष्य दिनाचे उद्दीष्ट देणेत आलेले होते त्यानुसार ३१ मार्च २०२२ अखेर एकूण ४३७०९ इतके मनुष्य दिन साध्य (१३५.९०%)केले आहे.सन २०२१-२२ मध्ये एकूण ११९ कामे सुरु करण्यात आली.त्यापैकी २१ कामे पूर्ण झाली असून ९८ कामे प्रगतीपथावर आहेत.म्हणजेच कोणतेही काम प्रलंबित रोहिलेले नाही.तसेच इतर विभागाची सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनपेट (जि.परभणी) नगरपरिषद यांना दुष्काळग्रस्त मजुरांना रोजगार हमी योजनेचा निधी देण्याबाबत**

**(७) ४३३४५ (१२-०४-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनपेठ (जि.परभणी) येथे शासनाच्यावतीने नगरपरिषद "क" वर्ग यांना दुष्काळग्रस्त मजुरांना रोजगार देण्यासाठी सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या कालावधीत निधी उपलब्ध करुन दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून किती जॉब कार्डधारक मजुरांना किती दिवस रोजगार व कोणत्या प्रकारची कामे मंजूर करण्यात आली व त्यावर किती खर्च झाला असून किती मजुरांना मजूरी न मिळाल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत काय,

(३) असल्यास, उक्त निधीचा योग्य विनियोग न केल्याबद्दल तक्रार आल्याची चौकशी करण्यात आली आहे, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०३-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

सोनपेठ "क" वर्ग नगरपरिषदेतील दुष्काळग्रस्त मजुरांना रोजगार देण्यासाठी सन २०१९-२० मध्ये शासनाच्या दिनांक ०६ मे, २०१९ रोजीच्या ज्ञापनान्वये रु.१०.०० (लक्ष) इतका निधी जिल्हाधिकारी परभणी यांना मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी रु.८,९६,४२६/- इतका निधी तहसिलदार सोनपेठ यांनी नगरपरिषद सोनपेठ यांना उपलब्ध करुन दिला आहे.

(२) सोनपेठ नगरपरिषद हद्दितील उपलब्ध जागेअंतर्गत रस्ते, जोड रस्ते इ. ठिकाणी जास्तीत जास्त २०० उंच रोपांची (१८ महिने वयोमानाची) लागवड करण्यात आली आहे. उक्त कामाकरिता २६३ जॉब कार्डधारक मजुरांनी (सरासरी ०४ दिवस) एकूण १५१.८ मनुष्य दिवस काम केले असून त्यांच्या मजुरीवर ३०,८१६/- इतका खर्च झाला आहे.

(३) शासनस्तरावर तक्रारी प्राप्त झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागात वादात्मक शेत जमिनीची चौकशी आदेशपर्यंत ताब्यात ठेवण्याबाबत.**

**(८) ४३३७४ (१२-०४-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात एका ७/१२ वर २० ते २५ हक्कदाराची नोंद असून कोणी एक मयत झाला तर त्यांचा हिस्सां कुटुंबियांना न देता गावचे काका अगर गावचा भाऊ यांना देवून टाकतात, हे खरे आहे काय

(२) तसेच, वडिलोपार्जित जमिनी-घरांचा हक्क शासकीय अधिकारी/तलाठी/ग्रामसेवक कोण्या एका व्यक्तीला कागदोपत्री देवून अन्य कायदेशीर हक्क असणारे भाऊ पुतणे यांच्यावर अन्याय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास अशा जमिनी व घरे यांचे हक्क कायदेशीर हक्कदार यांना उपभोगता यावेत म्हणून जिल्हाधिकारी तसेच तहसिलदार यांच्यामार्फत गेले २५-३० वर्षांपासूनचा अभिलेख तपासून खातरजमा व्हावी व यामध्ये दोषींवर कारवाई व्हांवी अथवा वादग्रस्तास जमिनींचे जोपर्यंत कायदेशीर वाटप होत नाही तोपर्यंत शासनाच्या ताब्यात ठेवण्याबाबत शासन संबंधितांना तातडीने आदेश देणार काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

ग्रामीण भागात एका ७/१२ वर २० ते २५ हक्कदाराची नोंद असून कोणी एक मयत झाला तर त्यांच्या हिस्सा त्याच्याच कुटुंबियाना न देता गावचे काका अगर गावचा भाऊ यांना देवून टाकुन वडीलोपार्जित जमिनी-घरांचा हक्क

शासकीय अधिकारी/ तलाठी/ग्रामसेवक कोण्या एका व्यक्तीला कागदोपत्री देवून अन्य कायदेशीर हक्क असणारे भाऊ पुतणे यांच्यावर अन्याय होत असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

७/१२ चे धारक सदरी नाव असलेला खातेदार मयत झाल्यास, त्यांचे कायदेशीर वारस तपासून गाव नमुना-६ क मध्ये वारसाच्या नोंद घेण्यात येतात. वारस नोंद झाल्यानंतरच कायदेशीर वारसांचे फेरफार मंजूर होऊन ७/१२ वरती फक्त कायदेशीर वारसांची नावे दाखल होतात. सदर कार्यवाही तलाठी, मंडळ अधिकारी यांच्याकडून केली जाते. नगर भूमापन झालेल्या क्षेत्रात, नगर भूमापन अधिकारी किंवा उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचे मार्फत मालमत्तेचा अधिकार अभिलेख म्हणून मालमत्तापत्रक ठेवले जाते. त्यांच्या मार्फत देखील एखाद्या मालमत्ताधारक मयत झाल्यास त्यांचे कायदेशीर वारस तपासूनच फक्त कायदेशीर वारसांच्या नोंदी वारस म्हणून घेतल्या जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथे तहसीलदार यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात अपहार केल्याबाबत

**(९) ४३३७८ (०७-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे श्री.राहुल पाटील हे तहसीलदार कार्यरत असताना मोठ्या प्रमाणावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता करण्यात येऊन सदर कामे न करता बनावट बिले बनऊन सदरहू बिले काढून शासनाच्या रक्कमेचा अपहार करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच धानोरा (खु)/वालेवाडी, ता.अंबाजोगाई येथे रोपवाटिका, मातीनाला बांध, नाला खोलीकरण, पांदण रस्ते आदि कामे घेण्यात येऊन सदर कामे न करता किंवा थोडी कामे केल्याचे दाखऊन अधिकाऱ्यांच्या संगनमताने बिले उचलून शासनाच्या रक्कमेचा अपहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी रोजगार हमी मंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०५-०१-२०२३) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) होय.

(५) मनरेगा अंतर्गत झालेल्या कामांच्या सखोल चौकशीसाठी चौकशीपथके नियुक्त करण्यात आली आहेत. सदर चौकशीनुसार प्राप्त होणाऱ्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दहिवडी (ता.माण, जि. सातारा) येथील तहसिलदारांचा वाहनचालक यांच्यावर कारवाई केल्याबाबत

**(१०) ४३८१८ (११-०४-२०२२). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिवडी (ता.माण, जि. सातारा) येथील तहसिलदार कार्यालयामध्ये तहसिलदारांचा वाहनचालक यांची लाचलुचपत प्रतिबंधक कायदा अनुषंगाने कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहनचालक तहसिलदार यांच्या गाडीवर अनेक वर्षापासून चालक असून जुने व नवीन तहसिलदार यांच्या सांगण्यावरुन पैसे घेत असल्याचे, तसेच त्यांच्या राणंद (ता.माण) गावी कोतवाल या पदावर कार्यरत असुन अनेक वर्षापासून तो तहसिलदार यांच्या गाडीवर चालक म्हणून कार्यरत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त वाहनचालक शासकीय-निमशासकीय आहेत काय तसेच वाहनचालक हे कोणाच्या सांगण्यावरुन पैसे घेत होते व त्याचे अनेक दिवसापासून वाळू माफियांशी संबंध होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती त्यात काय आढळून आले आहे,
(५) असल्यास, यासंदर्भात दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०१-२०२३) :**(१) दहिवडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१८/२०२२, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ (अ) प्रमाणे दिनांक २४/०१/२०२२ अन्वये तहसिलदारांचे वाहन चालक म्हणून काम करत असलेले कोतवाल यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.
(२) तहसिलदारांचे वाहन चालक म्हणून काम करत असलेले कोतवाल हे सन- २००८ पासून रांणद येथे कोतवाल पदावर कार्यरत होते.

मात्र, तहसिल कार्यालयाकडील नियमित वाहन चालक यांची सेवा दिनांक १८/०२/२०२१ ते १०/०१/२०२२ या कालावधीत परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, खटाव यांच्याकडे वर्ग करण्यात आल्याने तहसिलदार, माण यांच्या दिनांक १७/०२/२०२१ च्या आदेशान्वये, आलोसे कोतवाल हे उक्त नमूद कालावधीत तहसिल कार्यालयात वाहनचालक म्हणून काम करीत होते.
(३) कोतवाल हे शासकीय पद नसून मानधन तत्वावरील कार्यरत पद आहे. तसेच सदर कोतवाल हे कोणाच्या सांगण्यावरुन पैसे घेत होते व त्यांचे वाळू माफियांशी संबंध असल्याची बाब तपासामध्ये निदर्शनास आली नाही.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा यांच्यामार्फत चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन पंचायत समिती (जि.जालना) तहसील व जिल्हाधिकारी कार्यालय येथे रोजगार हमी योजनेत झालेल्या गैरप्रकाराबाबत**

**(११) ४४०८४ (२४-०४-२०२२). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरदन पंचायत समिती (जि.जालना) तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय येथे रोजगार हमी योजनेत झालेला गैरप्रकार नायब तहसीलदार यांनी निदर्शनास आणला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गैरप्रकाराप्रकरणी नायब तहसीलदार यांनी आंदोलन देखील केलेले आहे तसेच त्यांनी शासनाचे होणारे आर्थिक नुकसान झाले नसले तरी त्यांच्यावर चुकीची कार्यवाही करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०५-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
ग्रामसेवक कोठाकोळी तालुका भोकरदन यांनी त्यांच्या दिनांक १०/०९/२०१४ च्या अर्जान्वये वित्तीय वर्ष २०१४-१५ देयके/प्रमाणके सादर केलेले नसतानाही कुशल प्रदान झाल्याची बाब निदर्शनास आणून दिलेली आहे.
(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. प्रकरणातील संबधित जबाबदार दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरीता नेमलेल्या समितीने केलेल्या अहवालाच्या कार्यवाहीबाबत

**(१२) ४४७७५ (०६-१०-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील बेदखल कुळाच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरीता नेमलेल्या विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मध्ये अनुषंगिक सुधारणा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालातील कोणत्या शिफारशींच्या अनुषंगाने मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मध्ये कोणत्या स्वरुपाच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही. कोकणातील बेदखल कुळाच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरीता नेमलेल्या विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मध्ये अनुषंगिक सुधारणा करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणे खुर्द-आनंद विहार (जि.पुणे ) या भागात डोंगर पोखरून अनधिकृतपणे इमारती उभारण्यात आल्याबाबत

**(१३) ४४७९२ (०४-११-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणे खुर्द-आनंद विहार (जि.पुणे) या भागात डोंगर पोखरून त्या ठिकाणी अनधिकृत इमारती उभारण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल विभाग व महानगरपालिका प्रशासनाच्या बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने या भागात डोंगर पोखरले जात असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भागात डोंगर पोखरले जात असल्याने शासनाचा महसुल बुडाल्याने पर्यावरणाचा देखील ऱ्हास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०१-२०२३) :**(१),(२),(३) (४) व (५)

हिंगणे खुर्द-आनंद विहार (जि. पुणे) या भागात डोंगर पोखरून त्या ठिकाणी करण्यात आलेले अनाधिकृत प्लॉटिंगच्या सिमाभिंतीची व इतर अनाधिकृत बांधकामावर कारवाई करून बांधकामे निष्काशित करण्यात आली आहेत. व बी.डी.पी. आरक्षण अंतर्गत डोंगर फोडून खोदकाम करणाऱ्या विकासक/ मालक यांचेवर एमआरटीपी कलम ५२ अन्वये गुन्हे दाखल करणेत आलेले आहे, असे शहर अभियंता, महानगरपालिका, पुणे यांनी कळविलेले आहे. तसेच

मौजे हिंगणे खुर्द येथील अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्या इसमा विरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८ (७) नुसार रू.४,१९,७६,१९४/- इतक्या रक्कमेचे दंडाचे आदेश पारीत केले आहेत.

---

## अहमदनगर जिल्हयात कृषी विभागाच्या आत्मा योजनेंतर्गत कृषी व धान्य महोत्सवाकरिता जिल्हयाला निधी देण्याबाबत

**(१४) ४४८१४ (०१-११-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात कृषी विभागातून आत्मा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना थेट ग्राहकांना विक्री करता यावी तसेच शेतकरी व ग्राहक ही संकल्पना अधिक दृढ होण्यासाठी जिल्हा तसेच तालुका स्तरावर धान्य व फळे महोत्सव आयोजित करण्यात येतात, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त महोत्सव आयोजित करण्यासाठी कृषी विभागामार्फत निधी दिला जातो व कृषी विभागाने निधी न दिल्यास जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करुन असे महोत्सव घेण्यात येतात, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, कृषी विभागाने धान्य व फळे महोत्सव घेण्याचे नेमके धोरण काय तसेच असे महोत्सव घेण्यासाठी कोणकोणत्या जिल्ह्यांना निधी उपलब्ध करुन दिला आहे,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यासाठी सदर महोत्सव घेण्यासाठी निधी नसल्याचे जिल्हा कृषी अधिकारी यांच्याकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास, सदर शेतकरी व ग्राहक दोघांना मदत होण्यासाठी धान्य व फळे महोत्सव यासारखे उपक्रम राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अब्दुल सत्तार (१८-११-२०२२) :** (१) होय खरे आहे.

(२) होय खरे आहे.

(३) कृषि विभागामार्फत धान्य व फळे महोत्सवाचे आयोजन करणे करिता "जिल्हा कृषि महोत्सव" ही १०० टक्के राज्यपुरस्कत योजना जिल्हास्तरावर राबविण्यात येते. तथापि, सन २०२१-२२ मध्ये या योजनेत तरतूद मंजूर नव्हती.

२०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करीता सहाय्य (आत्मा) या योजने अंतगत प्रती जिल्हा रु.४.०० लाख निधी जिल्हा कृषि विस्तार आराखड्यानुसार धान्य व फळे महोत्सव या बाबीवर खर्च करण्याची मुभा होती.

(४) हे खरे नाही

(५) जिल्हास्तरावर शेतकरी व ग्राहक दोघांना मदत होण्यासाठी धान्य व फळे महोत्सव यासारखे उपक्रम आयोजनाच्या दृष्टिने राज्यशासना मार्फत "जिल्हा कृषि महोत्सव" ही १०० टक्के राज्य पुरस्कत योजना राबविण्यात येते. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये सदर योजना राबविणेकरीता निधी उपलब्ध नव्हता. तथापि, सन २०२२-२३ मध्ये सदर योजना मंजूर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## कोकणातील मच्छीमारांच्या जमिनीची ड्रोन सर्व्हेद्वारे करण्यात आलेल्या भूमापनाबाबत

**(१५) ४४८७९ (०७-१०-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील मच्छीमारांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यासाठी गावठाण परिसिमेतील घरांचे महास्वामित्व अभियानअंतर्गत ड्रोन सर्व्हेद्वारे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान भूमापन करुन मिळकत पत्र (प्रॉपर्टी कार्ड) देण्यात येईल, असे तत्कालीन महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ड्रोन सर्व्हेद्वारे भूमापनाचे काम पूर्ण झाले आहे काय, तसेच कोकणातील किती मच्छीमारांना मिळकत पत्र देण्यात आले व भूमापनाचे काम पूर्ण झाले नसल्यास त्याची कारणे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मुंबई विभागात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे ड्रोनव्दारे सर्व गांवठाण भूमापनाचे काम करण्यात येत असून कायदेशिर प्रक्रिया पूर्ण करीत मिळकत पत्रिका देण्याचे काम प्रगतीत आहे.

---

## राज्यात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अल्पवधीत जमिनीची मोजणी यंत्रणा पुणे जिल्ह्यात कार्यान्वित करण्याबाबत

**(१६) ४५१५१ (०७-१०-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जमीन मोजणीची अनेक प्रकरणे जमाबंदी आयुक्तांकडे प्रलंबित असल्याने प्रकरणाचा निपटारा होण्यासाठी जमाबंदी आयुक्तांनी जमीन मोजणी यंत्रे (रोव्हर मशिन) खरेदी करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,
(२) तसेच केवळ तीस सेकंदात जमिनीची अचूक मोजणी करणारी अत्याधुनिक यंत्रणा पुणे जिल्ह्यातील चार तालुक्यांमध्ये कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुके कोणते, या कामासाठी एकूण किती यंत्रे बसवावी लागणार आहेत, त्यासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे, यंत्रे प्रत्यक्षात बसवून कार्यान्वित करण्यासाठी सुमारे किती कालावधी लागेल तसेच यंत्राद्वारे जमीन मोजणी करण्याचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, सदर यंत्र खरेदीमुळे किती प्रलंबित प्रकरणे निघणार आहेत वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पुणे-६४, मुंबई-६१, नाशिक-५६, औरंगाबाद-८७, अमरावती-५७ व नागपूर-६७ असे एकूण ३९२ ROVERS & Controllers खरेदी करण्यात आलेले आहेत.
(३) राज्यात एकूण ७७ कॉर्स स्टेशन स्थापित करण्यात आलेले आहेत. जमीन मोजणीचे काम आधुनिक पध्दतीने तसेच जलद गतीने व अचूक करता यावे तसेच जमीन मोजणीसाठी लागणारा वेळ वाचविण्याच्या दृष्टीने भूमि अभिलेख विभागाकरीता GNSS ROVERS & CONTROLLERS खरेदी करण्याचे निश्चित केलेले आहे. याकरीता महसूल व वन विभाग यांचेकडील दिनांक ११/९/२०२० चे शासन निर्णयान्वये रु.६१.१४ कोटी निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. जमाबंदी आयुक्त व संचालक, पुणे कार्यालयाकडून ई-निविदा पोर्टलवरून GNSS ROVERS & CONTROLLERS खरेदी करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
सद्यस्थितीत जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून राज्यातील जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी ३९२ ROVERS & CONTROLLERS खरेदी केलेले आहेत.
(४) व (५) माहे मार्च, २०२२ अखेर १,०८,९१२ मोजणी प्रकरणे शिल्लक होती. त्यापैकी प्रलंबित मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात येवून जुलै, २०२२ अखेर ६०९७४ मोजणी प्रकरणे शिल्लक होती. माहे, ऑक्टोबर २०२२ अखेर ३६४७३ मोजणी प्रकरणांचा निपटारा करणेत आला असून २४५०१ शिल्लक प्रकरणे डिसेंबर, २०२२ अखेर निकाली करणेची दक्षता घेतली आहे.

तसेच रोव्हरचे सहाय्याने मोजणी कामाचा निपटारा जलद गतीने होत असल्याने प्रकरणे निकाली करणेची कार्यवाही सुरू आहे.

---

**मौ. चिंचणी (ता. डहाणू, जि.पालघर) येथील समूद्रालगतची सीआरझेड झोन अंतर्गत असतानाही अकृषिक केल्याबाबत**

**(१७) ४५१७३ (०४-११-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. चिंचणी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील जमीन मालकाने (श्री. मोहम्मद चुनावाला) सदर जमीन क्षेत्र सीआरझेड झोन अंतर्गत असतानाही त्या क्षेत्रावर बंगला बांधण्यासाठी तहसिलदार, डहाणू यांच्याकडे ते क्षेत्र अकृषिक करण्यासाठी रितसर परवानगी मागितलील्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन क्षेत्र सीआरझेड झोन अंतर्गत येत असल्याने त्याठिकाणी कोणतेही बांधकाम करण्यास कायद्यानुसार प्रतिबंध असतानादेखील तत्कालीन तहसिलदार, डहाणू यांनी संबंधित जमीनमालक यांना त्यांच्या मागणीनुसार चिंचणी येथील समुद्रालगतची ४ एकर जागा अकृषिक करण्याची परवानगी देऊन आर्थिक हितसंबंध जोपासले असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिकांनी तसेच पर्यावरणप्रेमी व ग्रामपंचायत सदस्यांनी तक्रारी केल्यामुळे मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी तत्कालीन तहसिलदार (श्री. सारंग) यांना त्याबाबत कायदेशीर नोटीस बजावली असून सदर जमीनींच्या अकृषिक आदेशाला स्थगिती दिल्याचेही निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सीआरझेड झोनअंतर्गत जमिनीला अकृषिक नियमबाह्य व कायद्याचे उल्लंघन करुन परवानगी दिल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१२-२०२२) :**(१) ते (४) मौ.चिचणी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील जमीन मालकाने सदर जमीन क्षेत्र सीआरझेड अंतर्गत असतानाही त्या क्षेत्रावर बंगला बांधण्यासाठी मागितलेल्या परवानगीच्या अनुषंगाने तत्का.तहसिलदार,डहाणू, जि.पालघर यांनी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२-ड नुसार जमिनीची मानिव रुपांतरित कर व अकृषिक आकारणीची रक्कम भरणा करुन १ ते ४ अटी व शर्तीवर अकृषिक प्रयोजनार्थ रुपांतरण करण्याची दिनांक ०९.०६.२०२१ रोजीच्या आदेशान्वये परवानगी दिली.

तत्का.तहसिलदार, डहाणू, जि.पालघर यांनी दि.०९.०६.२०२१ रोजीच्या आदेशान्वये नियमबाह्य बिनशेती परवानगी दिल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी पालघर यांनी दिनांक ०४.०४.२०२२ रोजीच्या आदेशान्वये तत्का.तहसिलदार, डहाणू, जि.पालघर यांचे दिनांक ०९.०६.२०२१ रोजीचे आदेश रद्द करण्यात आले आहेत.

तत्का.तहसिलदार, डहाणू, जि.पालघर यांनी नियमबाह्य बिनशेती परवानगी देण्याच्या केलेल्या अनियमतेच्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याबाबतच्या प्राप्त प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करण्याबाबत विभागीय आयुक्त कोकण विभाग यांना निर्देश देण्यात आले असून परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्याला यावर्षी रोपे लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आल्याबाबत**

**(१८) ४५३९६ (२०-०९-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयाला यावर्षी ७६लाख ९३ हजार ६०० रोपे लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असल्याचे नुकतेच माहे मे, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२० मध्ये किती रोपे लावण्यात आली होती व त्यापैकी किती रोपे जगली आहे याची नोंदच वन विभागाकडे नसल्याचेही निदर्शनास आले असून सन २०२१ चा वृक्ष लागवडीचा अंतिम अहवाल अदयाप उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र वृक्ष लागवड अभियान योग्यरित्या राबविण्यात न आल्याचे निदर्शनास आले आहे तसेच शासनाच्या वतीने रोपे लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असून निधी नसल्याने विविध शासकीय विभागांना स्वखर्चातून रोपे लावावी लागत आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

सन २०२२ मध्ये विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी उस्मानाबाद जिल्ह्यासाठी ७६,९३,६०० एवढे वृक्ष लागवड उद्दिष्ट दिलेले आहे. त्यानुसार ऑक्टोबर, २०२२ अखेर ५७,८३,७३३ एवढे उद्दिष्ट साध्य करण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | यंत्रणा | वृक्षलागवड उद्दिष्ट | वृक्षलागवड साध्य |
|---|---|---|---|
| १ | वन विभाग | १३०४१०० | १३०४१०० |
| २ | सामाजिक वनीकरण | ३२२१०० | ४४४००० |
| एकूण वन विभाग :- | | १६२६२०० | १७४८१०० |
| ३ | ग्रामपंचायत | २०५६४५० | २१२८०६६ |
| ४ | रेशीम | २०५६४५० | १२६५००० |
| ५ | इतर वनेत्तर विभाग | १९५४५०० | ६४२५६७ |
| | एकूण वनेत्तर विभाग | ६०६७४०० | ४०३५६३३ |
| एकूण एकंदर | | ७६९३६०० | ५७८३७३३ |

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासनाने वन विभागाचे अधिकृत www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये जिल्हानिहाय वृक्षलागवडीची नोंद घेण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली असून, उस्मानाबाद जिल्ह्यात वन विभाग व सामाजिक वनीकरण यंत्रणांची वृक्ष लागवडीची नोंद सदर ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये घेण्यात आलेली आहे.

सन २०२० च्या पावसाळयात सामाजिक वनीकरण विभाग, उस्मानाबाद यांनी मग्रारोहयो अंतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावर/जमिनीवर व रस्ता दुतर्फा असे एकूण ८३०७८ एवढी रोपे लागवड केली असून, माहे मे, २०२२ मध्ये जिवंत रोपांची टक्केवारी ७८.३८% इतकी आहे. तसेच सन २०२१ च्या पावसाळ्यामध्ये २६५१५० रोपांची लागवड करुन ती संगणक प्रणालीवर अपलोड करण्यात आलेली असून, त्याची माहे मे, २०२२ रोजीची जिवंत रोपांची टक्केवारी ९१.४५% इतकी आहे.

(३) हे खरे नाही.

स्व. वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र वृक्ष लागवड अभियान उस्मानाबाद जिल्ह्यात यशस्वीरित्या राबविण्यात आलेले आहे. सन २०२० व २०२१ मध्ये वृक्षलागवडीसाठी वनेत्तर यंत्रणांना वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडून निधीच्या उपलब्धतेच्या हमीपत्रानुसार मागणीप्रमाणे रोपे पुरवठा करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१९) ४५४८१ (०९-१०-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील २४२३ आंगणवाडया पैकी ५३८ अंगणवाड्यांना स्व:ताची इमारत नाही तसेच ४१६ अंगणवाड्यांमध्ये शौचालयाची व्यवस्था नसल्याची बाब दिनांक ५ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे या अंगणवाडया समाज मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय किंवा भाड्याच्या खोलीत भरविल्या जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास , अंगणवाडीच्या माध्यमातून बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण तसेच पोषण आहार देण्याचे काम केले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बालके पूर्व प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहू नये याकरिता अंगणवाडयांसाठी स्वतंत्र इमारत बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१७-०१-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत अंगणवाडी केंद्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| बाब | अंगणवाडी केंद्र | मिनी अंगणवाडी केंद्र | एकूण अंगणवाडी |
|---|---|---|---|
| मंजूर केंद्रे | २१६१ | २६२ | २४२३ |
| स्वत:ची इमारत असलेले केंद्र | १८४८ | ३९ | १८८७ |
| स्वत:ची इमारत असलेले केंद्र | ३१३ | २२३ | ५३६ |
| शौचालय सुविधा असलेली केंद्रे | १९११ | २३ | २०३४ |

स्वत:ची इमारत नसलेल्या ५३६ अंगणवाड्यांपैकी १०१ अंगणवाडी या नगरपंचायत/ नगरपरिषद क्षेत्रात आहेत. उर्वरित ४३५ अंगणवाडी केंद्रांपैकी १०५ अंगणवाडी इमारतीचे बांधकाम मंजूर असून बांधकामाची कार्यवाही सुरू आहे. सद्यस्थितीत ३३० अंगणवाडी इमारत बांधकामाची आवश्यकता असुन त्यापैकी २०७ अंगणवाडी केंद्र शाळेच्या इमारतीमध्ये व उर्वरित १२३ अंगणवाडी केंद्र भाडयाच्या / खाजगी / ग्रामपंचायत / समाज मंदीर इ. इमारतीमध्ये भरवण्यात येत आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) महिला व बाल विकास शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी २०२२ अन्वये महिला व बाल विकास सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत किमान ३% इतका निधी कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून सदर शासन निर्णयामध्ये अंगणवाडी केंद्रांचे नवीन बांधकाम करण्याचे प्रावधान आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) तहसीलदारांनी अधिकारांचा गैरवापर केल्याबाबत

**(२०) ४५६२६ (०१-११-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील तहसीलदारांनी जमीन व्यवहारामध्ये महसूल न्यायाधिकरणाला मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करुन शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडवून अपहार केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे चौकशी करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने मा.महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी कोकण आयुक्तांना चौकशीच्या सुचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीवर चौकशी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१२-२०२२) :**(१) ते (३) सन्माननीय लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक ०९/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार तत्का.तहसिलदार सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग व तत्का.अव्वल कारकून यांनी केलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण यांनी दिनांक ०७/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांना सुचित केले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कणकवली ( जि.सिंधुदूर्ग) वागदे येथील जमीन संपादित करण्यात आलेल्या जमिनमालकांना मोबदला न मिळाल्याबाबत

**(२१) ४५६३७ (०१-११-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील महामार्ग चौपदरीकरणात वागदे येथील काही भागातील दुसरी लेन सुरु करण्यासाठी जमिनमालकांना मोबदला न मिळाल्याने या मार्गाचे काम सुरु होऊ शकले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित जमिन मालकांना नोटिस व इतर कार्यवाही पूर्ण होऊन बराच कालावधी उलटूनही अद्याप मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व किती कालावधीत जमिन मालकांना त्यांचा मोबदला मिळणार आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-१२-२०२२) :** (१), (२), व (३)

संबंधित जमिन मालकांना नोटीसा देऊन, भूमीराशी पोर्टलव्दारे मोबदला देण्याची कार्यवाही सुरू आहे. अद्याप काही खातेदारांनी नोटीसा देऊन देखिल बँकचा तपशिल व अन्य आवश्यक तपशिल सादर केलेला नाही, त्यांना पुनश्च: नोटीसा देऊन पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणा (जि. नागपूर) तालुक्यातील अंतर्गत मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचे मुरुम-रेती अवैध उत्खनन सुरु असल्याबाबत**

**(२२) ४६१४० (२८-१०-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा (जि. नागपूर) तालुक्यातील तहसिल अंतर्गत मोठया प्रमाणात गौण खनिजाचे मुरुम-रेती अवैध उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात मेटाउमरी, मोहगांव, संगम, मडवा, किन्हाला, घोडेगाट आदी ठिकाणी खाजगी व शासकिय जागेवर मुरुमची चोरी माफिया करीत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगणा जंगल बोर अभयारण्यांतर्गत उत्खनन करण्यापूर्वी वनविभागाची परवानगी घेतली आहे काय,

(४) असल्यास, सदर अवैध उत्खनन व मुरुमची चोरी माफियाविरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलबांची काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१२-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

तालुका हिंगण येथे गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीवर आळा घालण्याकरीता तालुका प्रशासनकाडून नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांचे पथक तयार करण्यात आले असून सदर पथकाचे वतीने वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

नागपूर जिल्ह्यात गौण खनिज उत्खननासाठी तात्पुरती परवानगी देण्याकरीता जिल्हा खाणकाम आराखडा समिती गठीत करण्यात आली असून त्यामध्ये उप वनसंरक्षक, नागपूर हे सदस्य आहेत.

तालुका हिंगणा येथे गौण खनिजाचे अवैध उत्खनन वाहतुकी प्रकरणी सन २०२०-२१ ते सन २०२२-२३ पर्यत ७४ प्रकरणात रू.६,२९,९२,८००/- ऐवढी रक्कम शासन जमा करण्यात आलेली आहे.

---

**धामणगाव (जि.अमरावती) रेल्वे येथील तहसीलदार हे लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता स्वत: धनादेश वितरण करीत असल्याबाबत**

**(२३) ४६५५६ (०४-११-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील तहसीलदारांनी लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता स्वत: धनादेश वितरण करीत असल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या बैठकीत तहसीलदार उशीरा पोहोचणे व जाणीवपूर्वक राजशिष्टाचाराचा भंग करण्याचा प्रकार होत असल्याने याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.राज्यशिष्टाचार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीत तहसिलदाराची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०१-२०२३) :** (१) (२) व (३) तहसिलदार धामणगाव रेल्वे, जि.अमरावती हे लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता स्वत: धनादेश वितरण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

संबंधित तहसिलदार यांच्या विरुध्द तत्का.मा.मंत्री (राजशिष्टाचार) यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींची तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही. मात्र संबंधित तहसिलदार यांच्याविरुध्द विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसून आल्यामुळे तहसिलदार धामणगाव रेल्वे, जि.अमरावती यांना

दिनांक ०५.१२.२०२२ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**सारंगवाडी (ता. चिखली /मेहकर जि.बुलढाणा) येथे जलसंधारण विभागाच्या साठवण तलावातील अवैध उत्खननाबाबत**

**(२४) ४६५६२ (१४-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सारंगवाडी (ता.चिखली /मेहकर जि.बुलढाणा) येथे जलसंधारण विभागाच्या होत असलेल्या साठवण तलाव क्षेत्रात कंत्राटदाराने अवैधरित्या विनापरवाना गिट्टी क्रशर मशीन लावून अवैध उत्खनन करून लाखो ब्रास गिट्टी काढलेली असल्याने झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तेथील विना परवाना गिट्टी क्रशर मशीनला उपजिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या आदेशानुसार सिल केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सिल केल्या व्यतिरिक्त कोणतीही कारवाई न झाल्याने कावि/ अका. २/कक्ष-खनिकर्म / ३०७/१८ जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा दिनांक २१/८/२०१८ अन्वये चौकशी समिती गठीत केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०१-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे. जिल्हाधिकारी, कार्यालय, बुलडाणा यांनी गठीत केलेल्या चौकशी समीतीच्या अहवालानुसार तहसिलदार, मेहकर यांनी कारवाई करून मे, वॅाटरफ्रंट कंन्सट्रक्शन कंपनी प्रा. लि. औंध, पुणे यांना रू.२२,५६,५०,४००/- एवढा दंड करण्यात आलेला आहे. सदर दंड वसुल करण्याबाबत तहसिलदार, मेहकर यांच्याकडुन कार्यवाही सुरू आहे.

---

**दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला रास्त आणि किफायतशीर दर (एफआरपी) मिळण्याबाबत**

**(२५) ४६६८१ (३०-१०-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला रास्त आणि किफायतशीर दर (एफआरपी) मिळावा या शेतकरी संघटनांच्या मागणीची व्यवहार्यता तपासण्यासाठी शासनाने मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन केली असल्याचे माहे मे, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त समितीने अहवाल शासनाकडे सादर केला आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :** (१) व (२) राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला रास्त आणि किफायतशीर दर (एफआरपी) अधिनियम तयार करण्यासाठी नविन मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. तत्पुर्वी दुधाला हमीभाव (FRP) देण्याच्या संदर्भात इतर राज्यातील यासंदर्भातील व्यवस्था किंवा

कायदे / नियम आहेत, याची माहिती घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लोणार सरोवर (जि.बुलढाणा) येथील धार स्नानासाठी कायमस्वरूपी बंदी केल्याबाबत

**(२६) ४६७४२ (१७-०९-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जगप्रसिद्ध लोणार सरोवर (जि.बुलढाणा) येथे शेकडो वर्षांपासून प्रसिध्द पाण्याची धार वाहत असल्याने स्नानासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्यटक आणि भाविक येत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरातत्व विभागाने धार तीर्थ क्षेत्रांवर स्नान करण्यास कायमस्वरूपी बंदी घातली असून स्नान करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याबाबतचे पत्र दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी लोणार पोलीस स्टेशनला दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्नान तिर्थक्षेत्र बंद करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१२-२०२२) :** (१)होय.
(२) होय. भारतीय पुरातत्व विभाग, नागपूर मंडळ यांनी अशा स्वरुपाचे पत्र दिले आहे.
(३) कोविड-१९ या महामारीचा प्रसार टाळण्यासाठी व कुंडाजवळ स्नानासाठी होणारी गर्दी टाळण्याकरीता स्नानास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच सततच्या पाण्याच्या धारेमुळे व तेथे होणाऱ्या गर्दीमुळे स्मारकास क्षती पोहचण्याची शक्यता आहे.

---

### कल्याण (जि. ठाणे) तालुक्यातील गावठाण व गावठाण विस्ताराचे मोजमापन झालेल्या मालमत्ताधारकांना संच वाटप करण्याबाबत

**(२७) ४६७४९ (०१-११-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि. ठाणे) तालुक्यात सनद वेळेवर मिळत नसल्याने नवीन घरे बांधण्यासाठी किंवा दुरुस्ती करण्यासाठी मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याचे दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अडचणीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास उपअधीक्षक भूमी अभिलेख, कल्याण यांना निवेदन दिले , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील गावठाण व गावठाण विस्ताराच्या मोजमापन झालेल्या मालमत्ताधारकांना संच वाटप करण्याबाबतच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-१२-२०२२) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील ३६ गावांचे सविस्तर मोजणीचे काम खाजगी संस्थांना देण्यात आले असून ते पूर्ण झाले आहे. चौकशी अधिकारी यांचेकडून नगर भूमापन झालेल्या मिळकतींची चौकशी पूर्ण करण्यात आली असून ३२ गावांची चौकशी पूर्ण झाली आहे. चौकशी पूर्ण झालेल्या गावांपैकी ३० गावे अधिसूचना प्रसिध्द करून परिरक्षणासाठी घेण्यात आली आहेत. परिरक्षणासाठी घेण्यात आलेल्या या ३० गावांचे नागरी भूमापनाचे नकाशे नागरिकांसाठी उपलब्ध आहेत. शासनाच्या धोरणानुसार नागरिकांना मिळकतपत्रिका डिजीटाईज स्वरूपात शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे अपेक्षित असून मिळकतपत्रिका डिजीटाईज करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

खाजगी संस्थांना स्थानिकांनी विरोध केल्यामुळे, बांधकामे व विकासकामांमध्ये झालेली वाढ व बदल यांमुळे मोजणीस विलंब झाला आहे. तसेच चौकशी अधिकारी यांची पदे रिक्त असल्यामुळे अपेक्षित कालावधीत चौकशीचे काम पूर्ण करता आले नाही. चौकशी काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा घटकदर प्रस्ताव मंजूर करून घेऊन अधिसूचना प्रसिध्द करणे ही प्रदिर्घ प्रक्रिया आहे.

---

**शासनाने गावठाणांपासून २०० मीटर पर्यंत बिगरशेती परवान्याची गरज नसल्याचा निर्णयाबाबत घेतला**

**(२८) ४६९११ (०१-११-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गावठाणापासून २०० मीटरपर्यंत बिगरशेती परवान्याची गरज नसल्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची अंतिम नियमावली होऊन अंमलबजावणीसाठी शासन निर्णय निर्गमित झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या निर्णयामुळे राज्यात शहरालगत सिमेंटची जंगले उभी राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासनाने फेरनिर्णय घेवून सदर निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-१२-२०२२) :** (१),(२),(३) व (४)

महाराष्ट्र जमीन महसूल १९६६ मधील कलम ४२ (ब), ४२ (क) व ४२ (ड) या नियमान्वये केलेल्या सुधारणांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी संपूर्ण राज्यात एकसारखी कार्यपध्दती होण्याच्या दृष्टीकोनातून सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना कार्यवाही करण्यासाठी शासनाने दि.१३/०४/२०२२ च्या परिपत्रकान्वये दिशानिर्देश दिलेले आहेत.

अंतिम विकास योजना/ प्रारुप तसेच अंतिम प्रादेशिक योजना किंवा प्रारूप विकास योजना तसेच गावठाणाच्या कलम १२२ खालील घोषित हद्दीपासून २०० मीटरच्या परिघीय क्षेत्रात असलेली जमीन/भुखंड मानीव अकृषिक करण्याबाबतची प्रकिया नमुद असुन त्याअन्वये जमिन बिनशेती करण्याची प्रक्रिया सुलभ केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागाव ( जि.यवतमाळ ) तालुक्यात प्रशासनाच्या सर्वच विभागात**
**तालुक्याचा विकास होत नसल्याबाबत**

**(२९) ४७०९२ (०१-११-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यात प्रशासनाच्या सर्वच विभागात प्रभारी अधिकारी असल्याने तालुक्याच्या विकासाला अडथळा येत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यात सर्वच विभागात प्रभारी अधिकारी असण्याची कारणे काय आहेत, व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :** (१),(२) व (३) महागाव तालुक्यामध्ये माहे एप्रिल, २०२२ च्या दरम्यान १) पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, महागाव २) उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, महागाव

३) तालुका कृषी अधिकारी, महागाव या पदावर नियमित अधिकारी कार्यरत होती.

तहसीलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी, उप अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, दुय्यम निबंधक, महागाव या रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे सोपवून तालुक्यातील प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडले जात आहे. तसेच सदर रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही संबंधित विभागांकडून करण्यात येत आहे.

---

**अक्कलकोट ते सिन्नर (जि.सोलापूर) रस्त्यावरील भूमिअधिग्रहण करताना त्रुटी राहिल्याबाबत**

**(३०) ४७४९७ (२७-१०-२०२२). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट ते सिन्नर (जि.सोलापूर) या रस्त्यावरील भूमिअधिग्रहण करताना त्रुटी राहिल्याने रस्ता अपूर्ण राहिला असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अक्कलकोट ते सिन्नर या राष्ट्रीय महामार्गाच्या जमीन अधिग्रहण यातील त्रुटी दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी फेर प्रस्ताव सादर करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार रस्त्यासाठी भूसंपादन करताना येथील शेतकऱ्यांना बाजारभावा नुसार देय असणारी रक्कम देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) होय अंशत: खरे आहे. तथापि भूमि अधिग्रहण करताना त्रुटी राहिलेल्या नसून भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होऊन त्यांचा मावेजा शेतकऱ्याच्या खात्यावर जमा झालेला नसल्याने शेतकऱ्यांनी काम करण्यास अडथळा निर्माण केल्याने एकूण ३७.३३ कि.मी. लांबी पैकी ४.२२५ कि.मी. लांबीचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही.

(२) भूसंपादनाच्या रक्कमेपोटी मंजूर अंदाजपत्रकामध्ये रुपये १०.८६ कोटी इतक्या रक्कमेचे तरतूद करण्यात आलेली होती. तथापि संयुक्त मोजणी नंतर भूसंपादनाची रक्कम रुपये ३२.९४ कोटी इतकी रक्कम लागणार असल्याचे निदर्शनास आल्याने कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, सोलापूर या विभागाने वाढीव रक्कमेसाठी परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे पाठपुरावा करुन भूसंपादन रक्कम मंजूर करुन घेतलेली आहे.

(३) उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १, सोलापूर यांनी दिलेल्या निवाड्यानुसार रस्ते परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून रुपये ३२.९४ कोटी इतकी रक्कम पत्र क्रमांक NH-१२०१४/१३२/२०१६-MAH ( P-६) ( Part१) dt.०२.०३.२०२२ अन्वये मंजूरी दिलेली असून भूसंपादन रक्कम वाटपाची कार्यवाही भूमी राशी पोर्टलद्वारे प्रगतीपथावर आहे. उपजिल्हाधिकारी,

भूसंपादन क्र.१,सोलापूर यांना एकूण अनुदान रुपये ९ कोटी इतके प्राप्त झालेले होते. त्यापैकी वाटप रुपये रु.७.२७ कोटी इतके झालेले आहे व शिल्लक रक्कम रुपये १.७३ कोटी इतकी आहे.

(४) रस्ते परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार भूसंपादनाची रक्कम केवळ ऑनलाईन पध्दतीने भूमी राशी पोर्टलद्वारे वाटप करण्याचे निर्देश आहेत. सद्यस्थितीत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १ सोलापूर यांच्या मार्फत भूमी राशी पोर्टलद्वारे भूसंपादन मोबदला अदा करण्याचे काम प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**खानापूर तालुक्यात ( जि. सांगली ) येथे विभागाच्या बेजाबदारपणामुळे अनेक झाडे करपून गेल्याबाबत**

**(३१) ४७७२४ (२२-०९-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि. सांगली) तालुक्यात मागील पाच वर्षात लाखो रुपये खर्च करुन हजाराहून अधिक झाडे लावण्यात आली होती परंतु संबधित विभागाच्या बेजबाबदारपणामुळे त्यातील अनेक झाडे करपून गेल्याचे बाब माहे मे,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.

खानापूर तालुक्यात (जि. सांगली) सामाजिक वनीकरण शाखेमार्फत सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या तीन वर्षांच्या कालावधीत घेण्यात आलेली रोपवने संबंधित विभागांस (उदा. ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम व जलसंधारण विभाग) हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. सदर रोपवने हस्तांतरीत करते वेळी संबंधित यंत्रणेने रोपवनाची पाहणी करुन, पंचनामा करून व जिवंत रोपांची टक्केवारी तपासून रोपवने ताब्यात घेतली आहेत. रोपवने संबंधित यंत्रणेस हस्तांतरीत करतेवेळी सरासरी जिवंत रोपांची टक्केवारी खालीलप्रमाणे होती:-

| अ.क्र. | वर्ष | लावलेली रोप संख्या | रोपवन हस्तांतरीत करतेवेळी जिवंत रोपांची संख्या | सरासरी जिवंत रोपांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २०१७-१८ | १०००० | ६६३५ | ६६.३५% |
| २ | २०१८-१९ | ५७६६५ | ३९१५६ | ६७.९०% |
| ३ | २०१९-२० | ११८९४७ | ८११८१ | ६८.२५% |
| ४ | २०२०-२१ | सामाजिक वनपरीक्षेत्रांतर्गत रोपांची लागवड करण्यात आलेली नाही | | |
| ५ | २०२१-२२ | १८६६५ | १६७२४ (अद्याप हस्तांतरण करण्यात आलेली नाही) | ८९.६०% |

सन २०२१-२२ मध्ये खानापूर वनपरिक्षेत्रा अंतर्गत एकूण ५ ठिकाणी वृक्षलागवड करण्यात आलेली आहे. सदर वृक्ष लागवडी अंतर्गत एकूण १८६६५ रोपांची लागवड करण्यात आलेली आहे. सदर रोपवनातील जिवंत रोपांची टक्केवारी सरासरी ८९.६० टक्के एवढी आहे.

तसेच, खानापूर तालुका हा सांगली प्रादेशिक वन विभागाच्या अधिनस्त आहे. सांगली प्रादेशिक वन विभागामार्फत सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षाच्या कालावधीत घेण्यात आलेल्या रोपवनांची माहे मे, २०२२ अखेरची जिवंत रोपांची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

| लागवडीचे वर्ष | लावलेली रोप संख्या | जिवंत रोपे | जिवंत रोपांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१८-१८ | ६७३७५ | ४८१५२ | ७१.८७% |
| २०१८-१९ | २०८५८५ | १३७७४९ | ६६.०४% |
| २०१९-२० | २५८००० | २०८३३५ | ८०.७५% |
| २०२०-२१ | १६००० | १४०८० | ८८.००% |
| २०२१-२२ | ७२००० | ६०९६२ | ८४.६७% |

सबब, खानापूर तालुक्यातील सामाजिक वनीकरण व प्रादेशिक वन विभाग यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या मागील पाच वर्षातील रोपवनात विभागाच्या बेजबाबदारपणामुळे झाडे करपून गेल्याची बाब माहे मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) येथील महिला तहसिलदार यांनी तलाठी व मंडळाधिकारी यांना अपमानीत केल्याबाबत**

**(३२) ४७९१४ (०२-११-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) येथील महिला तहसिलदार कामकाजाचा आढावा घेताना तलाठी व मंडळाधिकारी या कर्मचाऱ्यांना अपमानित करीत असल्याचे दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या कर्मचाऱ्यांचे खच्चीकरण होत असून त्यांचे मानसिक संतुलन बिघडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील तहसिलदारावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-१२-२०२२) :** (१), व (२) रावेर तालुका तलाठी संघ यांनी तलाठी संवर्गाला मिळत असलेल्या अपमानास्पद वागणुकीबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी, फैजपूर यांना दिले होते.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, फैजपूर भाग,फैजपूर जि. जळगांव यांनी संबधित तहसिलदार यांना खुलासा सादर करण्याबाबत दि.१६.०३.२०२२ रोजी कळविले होते. त्यानुसार सबंधित तहसिलदार यांनी दिनांक २१.०३.२०२२ रोजी तलाठी व मंडळाधिकारी कर्मचारी यांना अपमानास्पद वागणूक दिली नसल्याचा खुलासा सादर केलेला असून, सदर खुलासा संयुक्तीक असल्याचे जिल्हाधिकारी जळगांव यांनी कळविले आहे. तसेच रावेर तालुका तलाठी संघटनेच्या बैठकीत संबंधित तहसिलदार यांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार राहिली नसल्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबड (जि.जालना) येथील तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालयातील दुरवस्थेबाबत**

**(३३) ४८१९६ (३०-१०-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.जालना) येथील तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही कार्यालये तालुक्यातील प्रमुख ठिकाणे असून संपूर्ण तालुक्यामधून हजारो लोक या कार्यालयात दैनंदिन व्यवहाराची कामे करून घेण्यासाठी येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शासकीय कार्यालयांमध्ये मुलभूत सोई -सुविधा, महिला व पुरुष स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी व नागरिकांना बसण्याची व्यवस्था इत्यादी प्राथमिक सुविधा नसल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत संबंधित तहसिल प्रशासन व गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी अद्यापपर्यंत कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने उपरोक्त कार्यालयामध्ये मुलभूत सोयी सुविधा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०१-२०२३) :**(१) (२) (३) (४) व (५) अंबड (जि.जालना) येथील तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयात घाणीचे साम्राज्य पसरल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच सदर दोन्ही कार्यालये ही तालुक्यातील प्रमुख ठिकाणे असून, सदर दोन्ही कार्यालयात आवश्यक त्या मुलभूत/प्राथमिक सोयी-सुविधा करण्यात आल्या असल्याचे विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अहवालावरुन निदर्शनास येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सोसायट्यांना अधिक दराने आकारण्यात आलेला**
**अकृषी कराच्या नोटीसांना स्थगिती देण्याबाबत**

**(३४) ४८२७५ (०२-११-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर ठाण्यासह संपूर्ण राज्यातील हजारो सोसायट्यांना पंधराशे पेक्षा अधिक दराने अवाजवी बजावण्यात आलेल्या अकृषी कराच्या (एन.ए.थकबाकी) नोटीसा संदर्भात लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार, शासनाने सदरहू एन.ए. नोटीसांना दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थगिती देऊन कर आकारणीच्या नियमात बदल करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे जाहीर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००६ या कालावधीपासून ते अद्यापपर्यंत गृहनिर्माण संस्था आणि भूखंड धारकांनी वारंवार एन.ए. टॅक्स भरण्यास केलेला विरोध व त्यास शासनाकडून देण्यात आलेली स्थगिती विचारात घेता सदरहू एन.ए.टॅक्स कायमस्वरुपी रद्द करणेबाबतचा निर्णय शासनाने घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) तसेच, शासनाने याबाबत एन.ए. टॅक्स कायमस्वरुपी रद्द करण्याचा निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व यातून गृहनिर्माण संस्था व भूखंड धारकांना दिलासा देण्यासाठी अद्याप शासनातर्फे कोणती पर्यायी उपाययोजना करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-११-२०२२) :** (१),(२) व (३) होय. हे खरे आहे.
या कार्यासनाच्या दिनांक ०७/०४/२०२२ च्या पत्रान्वये, सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे की, दिनांक ०५ फेब्रुवारी,२०१८ च्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर करण्यात येणाऱ्या अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीस पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे. तसेच यानुषंगाने सक्तीच्या वसूलीसंदर्भात केलेली कार्यवाही थांबविण्यात यावी.
तसेच शासन निर्णय क्रमांक एनएपी-२०२२/प्र.क्र.५०/ज-१अ, दि.०६/०६/२०२२ अन्वये, अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीसंदर्भात शासनाची भूमिका ठरविण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्त करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुसुंबी (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील आदिवासींच्या बळकाविलेल्या जमिनींचा मोबदला मिळण्याबाबत**

**(३५) ४८२८९ (०१-११-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुसुंबी (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील श्री.आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासींची ६३.६२ हे.आर जमीन मानिकगड सिमेंट कंपनीने स्थानिक महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने दिनांक १९ मार्च, १९८५ पासून कोणताही मोबदला न देता, नियमबाह्य व बेकायदेशीरपणे ताब्यात घेतली आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाब भुसंपादन उपजिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ व ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास सदर जमिनीचा मोबदला व आदिवासींना न्याय देण्याबाबत

उपविभागीय अधिकारी, राजूरा यांना पत्र देवूनही उक्त जमिनीचा अद्याप कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर पत्रावरून तहसिलदार, जिवती यांनी मानिकगड सिमेंट कंपनीस लाभ मिळवून देण्यासाठी खोटा व बनावट अहवाल तयार करून दिनांक १६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाला पाठविल्याने अद्यापपर्यंत उक्त आदिवासी न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०१-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) चंद्रपुर जिल्हयातील जिवती तालुक्यातील कुसुंबी येथील मानिकगड सिमेंट कंपनीकरीता ६३.६२ हे. आर जागेचे म.ज.म.अ. १९६६ अन्वये जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचे आदेशान्वये भुपृष्ठ हक्काचे संपादन घराचा शेतीचा आणि संपादीत इतर मालमत्तेचा मोबदला वाटप करुन केल्याचे दिसून येते.

उपजिल्हाधिकारी भूसंपादन चंद्रपुर यांचे पत्र दिनांक २४.९.२०१७ व दिनांक ३.२.२०१८ नुसार जिल्हाधिकारी चंद्रपुर या कार्यालयाचे पत्र दिनांक १७.२.२०१८ अन्वये तहसिलदार, जिवती यांचेकडुन माहीती मागविण्यात आली होती.

तहसिलदार, जिवती यांनी दिनांक १६ में २०१८ रोजी उपलब्ध दस्ताऐवजानुसार मानिकगड सिमेंट कंपनी लाईम स्टोन भूसंपादन संबंधातील पार्श्वभूमी व दस्ताऐवज जोडण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील त्री-स्तरीय समिती गठीत करण्यात येऊन, समितीने तत्कालीन तहसिलदार, जिवती यांनी मंजूर केलेला फेरफार क्र. २४८ रद्द करण्याबाबत केलेल्या शिफारसीनुसार फेरफार क्र. २४८ रद्द करण्यात आला. सदर आदेशाचे विरुद्ध व्यवस्थापक मानिकगड सिमेंट कंपनी, गडचांदूर यांनी अपर जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडे केलेल्या अपीलावर नव्याने उपलब्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे तहसिलदार जिवती यांचा फेरफार मान्य केला असून फेरफार कायम ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तद्नंतर संबंधित आदिवासी यांनी अपर आयुक्त, नागपूर यांच्या न्यायालयामध्ये अपील दाखल करून अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे आदेशास अंतीम सुनावणी होई पर्यंत स्थगनादेश मंजूर केलेला असून, सदर प्रकरण दिनांक १९.१२.२०२२ रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे.

---

**कोरोना काळामध्ये लोककलावंताना अनुदान देण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात आल्याबाबत असूनही अद्याप पर्यंत लोककलावंता पर्यंत अनूदान पोहचले नसल्याबाबत.**

**(३६) ४८४८० (०४-११-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गाच्या काळामध्ये लोककलांचे सादरीकरण बंद असल्याने लोककलाकारांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागल्यामुळे शासनाने त्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजूनही कलाकारांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोक कलावंता मिळणारे अनुदान लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. कोरोना पार्श्वभूमीवर एकूण ५६,००० कलाकारांना अर्थसहाय्य करण्याबाबत शासन निर्णय क्र.

संकीर्ण ८८२०/प्र.क्र.१४७/सां.का.४, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ अन्वये मान्यता देण्यात आली. सदर कलावंतांची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करण्यात आलेली होती. सदरील निवड समितीने या योजनेखाली एकूण ३४३४ इतक्या कलावंतांची निवड करुन पात्र कलावंतांची यादी सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे पाठविली होती. त्याप्रमाणे पात्र कलाकारांच्या अचूक बँक तपशील प्राप्त असलेल्या खात्यावर रुपये ५,०००/- याप्रमाणे रक्कम जमा करण्यात आली आहे. अचूक बँक तपशील नसलेल्या ५४६ पात्र कलाकारांचे बँक तपशील पुनश्च: प्राप्त करण्याची कार्यवाही सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या स्तरावर सुरु आहे. तसेच शासन निर्णयाप्रमाणे पात्र असलेल्या ८४७ पैकी १०५ कलासमुहांना त्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

(३) शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण ८२२०/प्र.क्र.१४७ (भाग-२)/सां.का.४, दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ अन्वये जास्तीत जास्त कलाकारांना या योजनेचा लाभ व्हावा, याकरीता या योजनेस मार्च, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच सदर योजनेच्या निकषात शिथिलता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्मार्ट अंगणवाडी संकल्पने करीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) ४८४८६ (०४-११-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाड्या प्राथमिक शाळांना जोडून स्मार्ट करण्याचा दावा शासनामार्फेत करण्यात येतो मात्र अंगणवाड्यांमध्ये मुलांना पिण्याचे पाणी तसेच शौचालयांची सुविधा वीज आणि पाणी यासारख्या मुलभूत सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास,स्मार्ट अंगणवाडी योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील अंगणवाड्यांना स्मार्ट सुविधा देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून अंगणवाडींच्या नावांचे प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास,सदर योजनेकरीता पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने सदर योजना योग्य रितीने कार्यान्वित होत नसल्याचे निदर्शनास आले आले ,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्मार्ट अंगणवाडया या योजनेअंतर्गत राज्यातील अंगणवाडयामध्ये सोयी-सुविधा साठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१७-०१-२०२३) :** (१),(२), (३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यात एकूण ५५३ प्रकल्पांमध्ये ११०४८६ अंगणवाडी केंद्र मंजुर आहेत. त्यापैकी ६८१७१ एवढे अंगणवाडी केंद्र स्व:मालकीचे इमारतीत, २१४७९ एवढे अंगणवाडी केंद्र भाडयाच्या इमारतीत व उर्वरीत अंगणवाडी केंद्र समाजमंदिर, बौध्दविहार, वाचनालय, शालेय इमारत इ. ठिकाणी चालविण्यात येतात. राज्यातील एकूण अंगणवाडी केंद्रांपैकी ६५३३५ इतक्या अंगणवाडी केंद्राना पिण्याच्या पाण्याची सुविधा, ७७१७८ इतक्या अंगणवाडी केंद्राना शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे.

आदर्श अंगणवाडी या १००% राज्य पुरस्कृत योजनेमध्ये राज्यातील स्व:मालकीच्या अंगणवाडी केंद्राचे रुपांतर स्मार्ट अंगणवाडी मध्ये करण्यात येते. सदर योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्राना शौचालय बांधकाम व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे याबाबीचा समावेश नाही.

तथापि, अंगणवाडी केंद्रांकरिता शौचालय बांधकाम व पिण्याच्या पाण्याच्या सुविधेकरिता केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाकडून मंजूर होणा-या तरतुदीनुसार केंद्र व राज्य हिश्याचा निधी जिल्हास्तरावरून प्राप्त होणा-या प्रस्तावानुसार वितरीत करण्यात येतो.

तसेच आदर्श अंगणवाडी योजनेतर्गत अंगणवाडी केंद्रांना स्मार्ट अंगणवाडी केंद्रामध्ये रुपांतर करण्याकरिता देखील निधी वितरीत करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुलुंड (मुंबई) येथील तहसिल कार्यालयात तीन मिनिटांत जातीचा दाखला मिळत असल्याबाबत

**(३८) ४८५१२ (०१-११-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड (मुंबई) येथील तहसिल कार्यालयात अवघ्या तीन मिनिटांत जातीचा दाखला मिळत असल्याचे दिनांक ४ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाईन पद्धतीने आलेल्या अर्जानुसार अवघ्या तीन मिनिटांत जातीचा दाखला देण्यासाठी नायब तहसीलदार, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्या आयडीचा वापर करून अनोळखी व्यक्तीने हा प्रकार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०१-२०२३) :** (१), (२) व (३) श्री.गोविंद धोंडीबा खरटमोल यांनी दिनांक ०४.०३.२०२२ रोजी आपले सरकार पोर्टलवरून जातीचा दाखला मिळण्याबाबतचे २ अर्ज तहसिल कार्यालय, कुर्ला येथे सादर केले. सदर २ अर्जावर दिनांक ०१.०४.२०२२ रोजी रात्री ८.२१ वा. नायब तहसीलदार यांच्या युजर आयडीवरून आणि ८.२४. वा. तहसीलदार यांच्या युजर आयडीवरून "दाखला देणेस हरकत नाही" असा शेरा मारून उपविभागीय अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आले.
त्यावर त्याच दिवशी रात्री ८.२४ वा. उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगरे यांच्याकडील युजर आयडीने सदर दाखला मंजूर होऊन pending for signature मध्ये गेला. दिनांक ०४.०४.२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकास सदर बाब निदर्शनास आल्याने सदर दोन्ही अर्ज ११.०२ वा. Re-Approve करून पुन्हा तपासणीकरीता उपविभागीय अधिकारी यांच्या डेस्कवर घेण्यात आले. परंतु, सदर दोन्ही अर्ज आपोआप ११.१७ वा. अर्जदाराकडे परत गेल्याचे दिसून आले, सदरचे दोन्ही दाखले तहसिल कर्यालय,कुर्ला व उपविभागीय कार्यलय, पूर्व उपनगर यांच्या डेस्कवरून परवानगीशिवाय कार्यवाही झालेले दिसून आल्याने व सदर घटना गंभीर स्वरूपाची असल्याने सदर घटनेबाबत दिनांक ०२.०५.२०२२ रोजी मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई येथे FIR No. ९७/२०२२ नुसार माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० मधील कलम ४३/ए, ६६ अन्वये अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अनुषंगाने सद्य:स्थितीत ०५ साक्षिदार व ०२ संशयीत आरोपी यांचे जाबजबाब नोंदविण्यात आला असून गुन्ह्याच्या अनुषंगाने पुढील तपास मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडील सायबर गुन्हे शाखेमार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माळशिरस तालुक्यातील पोल्ट्री फॉर्म धारकांच्या विविध मागण्यांबाबत

**(३९) ४८९०१ (१४-१२-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळशिरस तालुक्यातील पोल्ट्री फॉर्म धारकांच्या विविध मागण्यांबाबत गेल्या अनेक वर्षापासून बहुतांशी शेतकरी पोल्ट्री फार्मिंग व्यवसाय करीत असून व्यवसायातील अनेक कंपनीने आतापर्यंत वेळोवेळी खरेदी दर, देखभाल खर्च, खाद्य किंमती, औषधांच्या किंमती किंवा इतर वस्तूंच्या दरांमध्ये वाढीव बदल केला परंतु, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या दरामध्ये फारसा बदल झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-१२-२०२२) :** (१) खासगी कुक्कुट व्यवसाय कंपन्या अथवा सहकारी संस्थांमार्फत विक्री करण्यात येत असलेल्या कुक्कुट पक्षांची पिले, अंडी खरेदी दर, देखभाल खर्च, खाद्य किंमती, औषधांच्या किंमती पशुसंवर्धन विभागामार्फत निश्चित करण्यात येत नाहीत अथवा त्यावर पशुसंवर्धन विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही.
(२) व (३) तथापि, खाजगीरित्या कुक्कुट पालन करणारे शेतकरी तसेच, कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपन्या यांना कुक्कुट पालन व्यवसाय करतांना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी दिनांक २१.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली कुक्कुट व्यवसाय करणारे शेतकरी, अंडी उत्पादन करणारे शेतकरी तसेच, कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपनी यांचे प्रतिनिधी यांचा समावेश असणाऱ्या राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे गठन करण्यात आलेले आहे.

---

**कोकणात शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(४०) ४९०५५ (०१-११-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील शेतकऱ्यांची जमिन सामायिक हिस्सेदारी मालकीची असल्याने महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड या योजनेचा लाभ घेण्यासाठी एकाचवेळी सर्व सहहिस्सेदारांची संमती मिळविणे अडचणीचे ठरते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कोकणातील बहुतांशी व्यक्ती ह्या कामानिमित्त बाहेरील शहरांमध्ये वास्तव्यास असल्यामुळे शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ जमिनीचा मालकी हक्क असलेल्या व्यक्तिला शासकीय कार्यालयामध्ये घेता येणे शक्य होत नसल्यामुळे शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित रहावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात स्वयंघोषणा प्रतिज्ञा पत्राद्वारे शेतकऱ्याला योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०३-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महसूली धोरणात्मक निर्णयाची बाब आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे फेकरी (ता.भुसावळ) येथील जमीनीचे ७/१२ उताऱ्यावर विभाजन न केल्याबाबत**

**(४१) ४९०७३ (०३-११-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे फेकरी (ता.भुसावळ) येथील गट नं. -३/४ ,प्लॉट न,१,४,५,६,या जमीनीची ७/१२,उताऱ्याचे विभाजन न करता खरेदी विक्री परवानगी मा.तहसीलदार भुसावळ यांनी जनकल्याण अर्बन कॉ ऑप क्रेडिट सोसायटी लि. भुसावळ यांच्या तर्फे वसुली व विक्री अधिकारी श्री रवींद्र धांडे यांना दिल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील जमिनीचे विभाजन न करणाऱ्या तहसिलदाराबाबत शासनाने चौकशी करुन सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणात बनावट विक्री परवानगी पत्र प्रकरणी संबंधित नायब तहसिलदार, संगायो शाखा, तहसिल कार्यालय, भुसावळ व महसूल सहायक, तहसिल कार्यालय, भुसावळ यांच्याविरुध्द भा.दं.वि.४२०,४६५,४६७,४७०, ४७१,४७२,४७३ व ३४ प्रमाणे भुसावळ शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१०९/२०२२ दाखल करण्यात येऊन त्यामध्ये संबंधितांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या दिनांक ०५.०८.२०२२ च्या पत्रान्वये संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना दिनांक ०५.०८.२०२२ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.
(३) अशी बाब नाही.

---

### महान थोर व्यक्तींशी संबंधित ऐतिहासिक वस्तू ,दस्तऐवज ,स्मृती परत आणण्याबाबत

**(४२) ४९२१२ (०९-१०-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे इंग्लंडमधील लंडन शहरातील विक्टोरीया- अल्बर्ट संग्रहालयात तर जगदंबा तलवार रॉयल कलेक्शन संग्रहालय येथे असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, राज्याच्या इतिहासाचा समृद्ध वसा आणि वारसा सांगणारी महान थोर व्यक्तींशी संबंधित ऐतिहासिक वस्तू, दस्तऐवज, स्मृती जे देशाबाहेर आहेत अश्या सर्व वस्तू, दस्तऐवजांबाबती नोंद शासनाकडे उपलब्ध आहे काय,
(३) असल्यास, सदरील ऐतिहासिक वस्तू ,दस्तऐवज राज्यात परत आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-१२-२०२२) :** (१) व (२) छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे इंग्लंडमधील लंडन शहरातील व्हिक्टोरिया-अल्बर्ट संग्रहालयात तर जगदंबा तलवार रॉयल कलेक्शन म्युझियम येथे असल्याचे महाराष्ट्रातील अनेक इतिहासकारांनी नमूद केले आहे. त्याबाबत पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय अधिक संशोधन करीत आहे. तसेच राज्याच्या समृद्ध वसा आणि वारसा सांगणारी काही थोर व्यक्तींशी संबंधित ऐतिहासिक वस्तू, दस्तऐवज, स्मृती जे देशाबाहेर आहेत अश्या सर्व वस्तू, दस्त ऐवजाबाबतची नोंद या विभागाकडे उपलब्ध असल्याचे आढळले नाही.
(३) याबाबत मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य, भारत सरकार यांच्याकडे विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वर्धा जिल्ह्यात धडक सिंचन विहीर योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्याबाबत

**(४३) ४९२७७ (०१-११-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यात धडक सिंचन विहिर योजनेंतर्गत अनेक विहिरींबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच आर्वी येथील मनीष उभाड यांच्या विहिरींच्या बाबतीत अधिकाऱ्यांनी मोजमाप न घेतल्यामुळे व त्यानंतर अतिवृष्टीमुळे विहिरी खचल्यामुळे मुल्यांकन करता येत नाही असे सांगून अनुदानाची रक्कम देण्यास टाळाटाळ करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता खोदकाम करुन बांधकाम झाले की नाही याची शहानिशा करुन अनुदानाची रक्कम वितरित करण्याबाबत तत्कालीन रोजगार हमी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्देश देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत विहिरींच्या अनुदानाची रक्कम देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०३-०१-२०२३) :** (१) अतिवृष्टीमुळे व काळया मातीच्या क्षेत्रामुळे जिल्ह्यातील खचलेल्या विहिरीबाबत श्री. मनिष उभाड मौजा लाडेगाव ता. आर्वी जि. वर्धा स.न.१३२ क्षेत्र १.५९ हे. आर यांचे व्यतिरिक्त अन्य शेतक-यांची लेखी तक्रार तालुकास्तरावर तसेच विभागास प्राप्त झाली नाही.
(२) श्री. मनिष उभाड मौजा लाडेगाव ता. आर्वी, जि. वर्धा यांनी अतिवृष्टीमुळे व काळया मातीच्या क्षेत्रामुळे विहिर खचल्याबाबत कळविले असता, चौकशी करुन त्यांना लेखी कळविण्यात आलेले आहे.
(३) व (४) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचे संयुक्त पहाणी दौ-यानुसार दिनांक २५.०२.२०२२ रोजी चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला आहे. विभागाच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निकषानुसार विहिरीचे काम पूर्ण केल्यास लाभार्थी श्री. मनिष उभाड यांना मंजूर रक्कमेपैकी उर्वरित शिल्लक रु. १,९३,३०५/- अदा करणे शक्य होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे धरणगाव (जि.जळगाव) येथील शासनाने गायरानासाठी आरक्षित केलेल्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(४४) ४९२७८ (३१-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धरणगाव (जि.जळगाव) येथील गट नंबर १२४८, १२४८/१ व १२४८/२ या सरकारी मालकीच्या जमिनी असून शासनाने गायरानासाठी आरक्षित केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीपैकी काही जमीन मानव सेवा संकल्प प्रतिष्ठान, मुंबई यांनी हजरत अहमद शहा कमानी शहा (डोंगर पीर) यांच्या समाधी स्थळासाठी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी जळगाव यांनी प्रस्तुत प्रकरणी सदर जमीन गुरे चरण्याची असल्यामुळे ती मानव सेवा संकल्प प्रतिष्ठान अथवा अन्य कोणालाही देता येणार नाही असा निर्णय घेऊन त्याप्रमाणे प्रतिष्ठानला कळविले असून मुख्याधिकारी, नगरपरिषद धरणगाव यांना सदर जागेवरील अतिक्रमण काढून टाकण्याबाबत आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हाधिकारी यांच्या आदेशानंतरही अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे गायरान बचाव मंच, धरणगाव यांनी आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत विधानसभा विरोधी पक्षनेता यांनी दिनांक ५ एप्रिल, २०२२ रोजी व त्यासुमारास महसूल मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर अतिक्रमण हटवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-१२-२०२२) :**(१), (२), (३), (४) व (५) हे खरे आहे.
(६) मौजे धरणगांव, ता. धरणगांव, जि. जळगांव येथील गट नं. १२४८/१ मधील शासकीय गायरान जमिनीवरील डोंगरपीरबाबा दर्गाजवळील अतिक्रमण/बांधकाम दिनांक ०२.११.२०२२ रोजी संबंधित क्षेत्रिय यंत्रणांच्या उपस्थितीत काढण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.
(७) अशी बाब नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील तलाठी संवर्गाच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(४५) ४९२८१ (३१-१०-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात महसूल विभागाच्या तलाठी संवर्गाच्या १०३ जागा रिक्त असल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील रिक्त जागांमुळे १६०० महसुली गावांपैकी ४०० महसुली गावांच्या कामकाजावर परिणाम होत आहे ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रिक्त जागा भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :**(१) व (२) अहमदनगर जिल्ह्यामध्ये माहे मार्च, २०२२ मध्ये तलाठी संवर्गाची ७३ पदे रिक्त होती. सदर रिक्त पदांमुळे कामकाजावर परिणाम होऊ नये याकरिता संबंधित तहसिलदार यांनी लगतच्या साझेच्या तलाठी यांचेकडे अतिरीक्त कार्यभार सोपविलेला आहे. त्यामुळे मुळ कार्यभार पाहून अतिरिक्त कार्यभार पाहतांना साजेनिहाय कामकाजाचे नियोजन करुन महसूली कामकाजावर परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

(३) व (४) आता शासनाने राज्यात तलाठी संवर्गाची रिक्त असलेली-१०१२ तसेच तलाठी संवर्गाची नव्याने निर्माण करण्यात आलेली-३११० अशा एकूण- ४१२२ पदांची तलाठी पद भरती प्रक्रिया करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ व दिनांक २१/११/२०२२ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण राज्यात तलाठी (गट-क) संवर्गाची पदभरती करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मौजे पेडगांव (ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर) येथील भुईकोट किल्ल्यांचे संवर्धन करण्याबाबत

**(४६) ४९४१२ (०९-१०-२०२२). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पेडगांव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या ठिकाणी असलेला भुईकोट किल्ल्यांची पुरातन विभागाकडून देखभाल करण्यात येत नसल्याने सदर किल्ल्यांची दूरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्लाच्या संवर्धनासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन किल्ला राज्य संरक्षित स्मारक नाही. तथापि, या किल्ल्यांच्या आतील भागामध्ये असलेल्या मंदिरे व पुरास्थळापैकी मल्लिकार्जुन मंदिर हे एकच मंदिर केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ, औरंगाबाद यांच्या अखत्यारीत असून या मंदिराचे जतन संवर्धनाचे कार्य त्यांच्यामार्फत होते.

(२) सदर किल्ला राज्य शासनाचा राज्य संरक्षित स्मारक नसला तरी या किल्ल्यावर दुर्गप्रेमी, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्या संमतीने स्वच्छता मोहिमा राबविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तोहोगाव ( ता. गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर ) गावात पशुवैद्यकीय डॉक्टर अभावी अनेकांची जनावरे मृत्युमुखी पडल्याबाबत

**(४७) ४९४२६ (०४-११-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोहोगाव ( ता. गोंडपिंपरी जि.चंद्रपूर ) गावात श्रेणी - १ पशुचिकित्सालय अस्तित्वात असून गेली तीन वर्षापासून कर्मचारी नसल्याने त्या परिसरातील दुधाळ जनावरे व शेती उपयोगी जनावरे रोगप्रादुर्भावाने मृत्युमुखी पडली तर काही जनावरे दुबळी झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील डॉक्टर अभावी ज्या गोर-गरीब शेतकरी शेतमजूरांची जनावरे दगावली व अपंगत्व आल्याने मोठे नुकसान झाल्याने जनावरांचे पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, राज्यातील प्रत्येक पशुवैदयकीय चिकित्सालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०१-२०२३) :** (१) व (२) सदर गाव परिसरातील शेतकरी व पशुपालकांकडून जनावरे मृत्यूमुखी पडत असल्याबाबत सूचना अथवा तक्रारी पशुवैद्यकीय संस्थेकडे/तालुका कार्यालयात/ जिल्हा कार्यालयात प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तदनंतर राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील नियमित रिक्त पदे भरण्याचे संकल्पीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात "लम्पी" आजाराच्या पार्श्वभूमीवर पशुवैद्यकीय चिकित्सकांची संख्या वाढविण्याबाबत

**(४८) ४९४४१ (०४-११-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुधनाची संख्या पाहता पशुवैद्यकीय चिकित्सकांची संख्या अपुरी पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वाढत्या "लम्पी" रोगाच्या पार्श्वभूमीवर पशुवैद्यकीय चिकित्सकांची संख्या वाढविणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त "लम्पी" आजाराच्या पार्श्वभूमीवर पशुवैद्यकीय चिकित्सकांची संख्या वाढविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०१-२०२३) :** (१), (२) व (३) २० व्या पशुगणनेनुसार राज्यात एकूण २१२१५४५९ इतके पशुधन घटक आहेत. (डोंगरी भाग ४६७०७३० व बिगर डोंगरी भाग १६५४४७२९) पशुधन घटक

विचारात घेता डोंगरी भागात १५५७ व बिगर डोंगरी भागात ३३०९ याप्रमाणे एकूण ४८६६ इतक्या पशुवैद्यकीय संस्थांची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत ४८५० इतक्या पशुवैद्यकीय संस्था अस्तित्वात आहेत. या संस्थांमार्फत शेतकरी/ पशुपालकांना अत्यावश्यक पशुवैद्यकीय सेवा पुरवण्यात येतात.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तदनंतर राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बांम्बेझरी (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील वनक्षेत्रात अनधिकृत इमारतीचे बांधकाम व अवैध डिझेलपंप उभारणीच्या तक्रारीबाबत

**(४९) ५३०१४ (२६-१२-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांम्बेझरी (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील वनक्षेत्रात अनधिकृत इमारतीचे बांधकाम व अवैध डिझेलपंप उभारणीबाबतच्या तक्रारी स्थानिक नागरीकांनी व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दिनांक ०६ जून, २०२२ व १९ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्व्हे नं.४९ व वनक्षेत्रात अनधिकृत बांधकाम केल्याचे मंडळ अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार वन अधिनियम व महसूल अधिनियमाचे उल्लंघन करुन बेकायदेशीरपणे करण्यात आलेल्या बांधकामाबाबत कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-१२-२०२२) :** (१) मौ. नौकारी (बु.), माणिकगड माईन्स, ता. राजूरा, जि. चंद्रपूर येथील अवैध पेट्रोल - डिझेल पंप महसूल / वनक्षेत्रात अनधिकृत इमारतीचे बांधकाम केल्यासंदर्भातील तक्रार दिनांक ०२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये महसूल विभागाकडे प्राप्त झाली आहे.

(२) व (३) महसूल विभागाने केलेल्या चौकशीमध्ये स. नं. ४९ (वन कक्ष क्र. ३४) मधील वनजमिनीवर डिझेल पंप व इमारतीचे बांधकाम झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी वन विभागाने केलेल्या प्राथमिक चौकशीत सदर डिझेल पंपाचा समावेश केंद्र शासनाने दिनांक २८.११.२००१ रोजीच्या पत्रान्वये मानिकगड सिमेंट कंपनीला खाणकाम व इतर पूरक कामांकरिता वळती केलेल्या २३८.९६ हे. वनक्षेत्रामध्ये असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर डिझेल पंप व इमारतीच्या बांधकामाच्या वैधतेबाबत संबंधित तहसिलदार यांच्याकडून अधिक चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे शेडनेट हाऊसच्या शेतक-यांना कर्जमाफी देण्याबाबत**

**(५०) ५४१६७ (२६-१२-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे शेतकऱ्यांना राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत सन २०१४-१५ या कालावधीत एकूण १५४ शेडनेट हाऊसची उभारणी करण्यात आली होती तसेच महाराष्ट्रातील हायटेक शेती, पॉलिहाऊस, शेडनेट या २०१३-१४ या कालावधीत सुरु करण्यात आलेल्या प्रकल्पात राज्यातील बाराशे व विदर्भातील ३०० शेतकरी समाविष्ट झाले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच या व्यवसायासाठी तत्कालीन सरकारने ५० टक्के अनुदान तत्वावर शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात कायमस्वरुपी दुष्काळामुळे या शेतीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च येत असल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी ५० टक्के अनुदान मिळूनही बँकेच्या कर्जाचा आकडा दुप्पटीने वाढत असून बँकांमार्फत वसुलीसाठी वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाकडून राबविण्यात आलेल्या महात्मा फुले कर्ज मुक्त योजनेअंतर्गत शेडनेट शेतीचा समोवश करुन शेडनेट शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून कर्जमाफी देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (३०-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ साली ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथे १०३ शेतकऱ्यांना राष्ट्रीय फलोत्पादन अभियांनांतर्गत लाभ देण्यात आला आहे. तसेच राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सन २०१३-१४ मध्ये पॉलिहाऊस व शेडनेटगृह याबाबींकरिता राज्यातील ९७४ शेतकऱ्यांना व त्यापैकी विदर्भातील १३९ शेतकऱ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) सद्यस्थितीत शेडनेट शेतकऱ्यांस कर्जमाफी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.